# आकाशवाणी, पुणे
# राष्ट्रीय बातमीपत्र
# दुपारी 1 वा. 30 मि.

**दि- 22.04.2021** **वार- गुरवार**

**कोरोनाचा प्रादुर्भाव पुन्हा वाढतो आहे; त्यामुळे सर्वांनीच आवश्यक सुरक्षा उपायांचं पालन करावं आणि पात्र नागरिकांनी न घाबरता लसीकरण करून घ्यावं असं आवाहन करत आहोत. सुरक्षित राहा आणि कोरोना संसर्ग रोखण्यासाठी मास्क वापरा, हात वारंवार स्वच्छ धुवा, सुरक्षित अंतर ठेवा.**

1. चोवीस तासातील कोरोनाबाधितांच्या संख्येत नवा उच्चांक, 3 लाख 14 हजार नवे कोरोनाबाधित, तर कोविड-19 मुळे 2104 जणांचा मृत्यु
2. रेमडेसेवीरचा पुरवठा सुरळीत राखण्यासाठी केंद्राचा आराखडा
3. राफेल विमानांच्या पाचव्या ताफ्याचं भारतात आगमन आणि
4. पश्चिम बंगाल मध्ये काही किरकोळ तणावाच्या घटना वगळता, विधानसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातील मतदान शांततेत सुरू

---

**देश कोविड**

आज सकाळी संपलेल्या चोवीस तासांत देशात कोरोना नवबाधितांची उच्चांकी संख्या नोंदवली गेली. 3 लाख 14 हजार नव्या रुग्णांची नोंद झाल्याचं आरोग्य मंत्रालयानं कळवलं आहे. यासह देशातील एकंदर कोरोना बाधितांची संख्या एक कोटी 59 लाखांच्या पुढे गेली आहे. देशात सध्या 22 लाख 91 हजार रुग्णांवर उपचार सुरु असून, ही संख्या एकूण बाधितांच्या 14 पूर्णांक 38 शतांश टक्के इतकी आहे.

कोविड मुळे एकाच दिवसात होणाऱ्या मृत्यूंची संख्याही उच्चांकी असून काल दिवसभरात 2104 जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे देशात कोविड मुळे झालेल्या एकंदर मृत्युंची संख्या एक लाख 84 हजार झाली आहे.

सातत्याने वाढत असलेल्या नवबाधितांच्या संख्येमुळे देशातील रुग्ण बरे होण्याचा दर कमी होऊन, तो 84 पूर्णांक 45 शतांश टक्के इतका झाला आहे. गेल्या चोवीस तासात 1 लाख 78 हजार रुग्ण या आजारातून बरे झाले. त्यामुळे देशात या आजारातून बरे झालेल्यां रुग्णांची एकूण संख्या, एक कोटी 34 लाख इतकी झाली आहे.

देशात काल 22 लाख 11 हजार 334 लाभार्थ्यांना कोरोना प्रतीबंधात्मक लस देण्यात आली. त्यामुळे एकंदर लसीकरण झालेल्यांची संख्या 13 कोटी 23 लाख 30 हजार 644 झाली आहे.

**रेमडेसिवीर**

कोविड 19 चा प्रादुर्भाव सर्वाधिक असणाऱ्या देशातल्या 19 राज्यातील, रेमडेसिवीर इंजक्शनची वाढती मागणी लक्षात घेता, त्याचा पुरवठा सुरळीत सुरू राहण्यासाठी, केंद्र सरकारने यासंदर्भात एक आराखडा तयार केला आहे. त्यानुसार राज्य सरकार या औषधांची खरेदी घाऊकपणे तसच खाजगी उत्पादकांच्या मार्फत ही करू शकतात. या रेमडेसिवीर इंजक्शन च्या पुरवठासंदर्भातील आराखड्याची अंमलबजावणी, येत्या 30 एप्रिल पर्यंत करण्यात येणार असून, त्यानंतर संबंधित राज्यसरकारांशी चर्चा करून, त्यात सुधारणा करण्यात येईल. रेमडेसिवीर इंजक्शनचं उत्पादन वाढवण्यासाठी केंद्र सरकार आवश्यक त्या सर्व उपाययोजना करत असून, त्याचं देशान्तर्गत उत्पादन दर

महिन्याला 38 लाखांवरून आता 74 लाखांपर्यंत वाढवण्यात आलं आहे. तसंच 20 नव्या रेमडेसिवीर इंजक्शन उत्पादन प्रकल्पांना केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. त्याच्या निर्यातीवर ही तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. केंद्र सरकारने रेमडेसिवीर इंजक्शन उत्पादन कंपन्यांना अनेक प्रकारे सवलती आणि पाठींबा दिला असून, त्यांना आधीची बाजारातील मागणी पूर्ण केल्यानंतरचं, नवी मागणी नोंदवण्याच्या सूचना केल्या आहेत. तसंच रेमडेसिवीर इंजक्शनच्या वितरणात कोणतेही अडथळे येऊ नयेत या दृष्टीने त्यावर देखरेख ठेवण्यासाठी, विशेष विभागीय अधिकाऱ्याची नेमणूक राज्य सरकारांनी करावी अशा सूचनाही, आरोग्य मंत्रालयानं दिल्या आहेत. तसंच रेमडेसिवीर इंजक्शनच्या किंमती आणि प्रत्येक राज्याला होणाऱ्या वितरणावर लक्ष ठेवण्यासाठी राष्ट्रीय औषध मूल्य नियंत्रण प्राधिकरणाने, एक विशेष कक्ष स्थापन केला असल्याचं ही आरोग्य मंत्रालयाने म्हंटल आहे.

**<u>केजरीवाल</u>**

दिल्लीत वाढत्या कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर, ऑक्सिजनचा तुटवडा जाणवत असून, राज्य सरकार ऑक्सिजनचा पुरवठा वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे, असं मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितल. सध्या दिल्लीत दररोज 700 टन ऑक्सिजनची गरज असून, केंद्र सरकारने दिल्ली ला मिळणाऱ्या ऑक्सिजनच्या पुरवठ्यात कालच वाढ केली आहे, आता दररोज 378 टनावरून हा कोटा 480 टन एवढा वाढवल्याबद्दल मुख्यमंत्री केजरीवाल यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत. देशातल्या इतर राज्यांनी ही जमल्यास दिल्लीला ऑक्सिजनचा  पुरवठा करण्यासाठी मदत करावी, असं आवाहन ही केजरीवाल यांनी यावेळी केलं.

**<u>राफेल</u>**

राफेल विमानांच्या पाचव्या ताफ्याचं आज भारतात आगमन झालं. फ्रांस आणि संयुक्त अरब अमिरातीच्या, हवाई दलांच्या सहाय्यानं हवेतच इंधन पुनर्भरण करत, या लढाऊ विमानांनी जवळपास 8 हजार किलोमीटर हवाई अंतर पार केलं.

भारतीय हवाई दलानं फ्रांस आणि संयुक्त अरब अमिराती च्या हवाई दलांचे आभार मानले आहेत. एअर चीफ मार्शल आरकेएस भदौरीया यांनी फ्रांस इथल्या मेरिग्नाक हवाई तळावरून या विमानांना हिरवी झेंडी दाखवली होती.

**<u>मुर्मू निवड</u>**

भारताचे महालेखा परीक्षक आणि नियंत्रक जी सी मुर्मू यांची आंतर राष्ट्रीय स्तरावरील रासायनिक शस्त्र विरोधी संघटनेचे अर्थात ओ पी सी डब्लू या संघटनेचे बाह्य लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही निवड 2021 पासून, पुढील तीन वर्षांसाठी करण्यात आली आहे. संघटनेच्या काल झालेल्या बैठकीत ही निवड करण्यत आली असून, जागतिकस्तरावर ही निवड भारताचं महत्व वाढवणारी मानली जात आहे. या संघटनेचा कार्यकारी मंडळाचा सदस्य आणि आशियाई देशांचा प्रतिनिधी म्हणूनही, भारताला पुढील दोन वर्षासाठी सदस्यत्व मिळाल आहे

**<u>पश्चिम बंगाल मतदान</u>**

पश्चिम बंगाल मध्ये काही किरकोळ तणावाच्या घटना वगळता, आज विधानसभेच्या सहाव्या टप्प्यातील मतदान शांततेत सुरू आहे. सकाळी साडे अकरा पर्यंत 37 पूर्णांक 27 शतांश टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडनुकीच्या 6 व्या टप्प्यात, राज्यातील नादिया, 24 परगणा, उत्तर दिनाजपुर, आणि पुर्बो बर्धमान या 4 जिल्ह्यातील 43 विधानसभा मतदारसंघात आज मतदान होत आहे. त्यासाठी 306 उमेदवार निवडणूक रिंगणात असून, भाजप आणि तृणमूल कॉंग्रेस सर्व 43 जागांवर, तर मार्क्सवादी कम्युनिस्ट

पक्ष 23 जागांवर, कॉंग्रेस 12 जागांवर, तर बहुजन समाज पक्ष 37 जागांवर निवडणूक लढवत आहे. आघाडीच्या नामवंत उमेदवारांमध्ये भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष मुकुल रॉय हे कृष्ण नगर मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत.

**फिक्की**

देशातील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव आणि रुग्णांसाठी ऑक्सिजन ची वाढती मागणी लक्षात घेता, औद्योगिक क्षेत्राला उत्पादनासाठी ऑक्सिजनचा पुरवठा कमी झाला आहे त्यामुळे औद्योगिक उत्पादनासाठी त्याचा पुरवठा सुरळीत होण्यासाठी उद्योग क्षेत्राने काही काळ परिस्थितीवर लक्ष ठेवून संयम बाळगावा, केंद्र सरकार उद्योग क्षेत्राला सर्वतोपरी सहकार्य करेल असं आश्वासन, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिल आहे. फिक्की या उद्योजकांच्या संघटनेच्या कार्यकारी मंडळांबरोबर, दुरदृष्य प्रणाली द्वारे झालेल्या बैठकीत त्या बोलत होत्या. सध्या काही उद्योग प्रकल्पात त्यांच्या उत्पादनासाठी तयार करण्यात येणारा ऑक्सिजनही सरकारला वैद्यकीय कारणासाठी द्यावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना, सीतारामन म्हणाल्या की ऑक्सिजनचा पुरवठ्याबाबत योग्य योजना बनवण्यात आली असून, कोरोना प्रादुर्भाव जास्त असणाऱ्या 12 राज्यांमध्ये, नवीन ऑक्सिजननिर्मिती प्रकल्पांना ही मान्यता देण्यात आली आहे. ऑक्सिजनच्या आंतर राज्य वाहतुकीला ही परवानगी देण्यात आली असून, जिल्हा स्तरावर त्याचा योग्य पुरवठा होतो कि नाही यावर, पुढचे 15 दिवस लक्ष ठेवण्यात येत आहे. सुरक्षिततेचे सर्व उपाय करून 24 तास ऑक्सिजन सिलेंडर भरण्याला ही परवानगी देण्यात आल्याच सीतारामन यांनी यावेळी सांगितल.

**फ्लोईड हत्या दोषी**

अमेरिकेत मागच्या वर्षी गाजलेल्या जॉर्ज फ्लोईड हत्या प्रकरणी, मिनीआ पोलीस चे माजी पोलीस अधिकारी डेरेक चाउविन याला दोषी ठरवण्यात आल्या नंतर, मिनीआपोलीस इथं पोलीस विभागात बेकायदेशीरपणे अधिकाराचा दुरुपयोग केला जातो का, याचा तपास करण्यासाठी अमेरिकेच्या केंद्रीय तपास यंत्रणेन विशेष समिती स्थापन केली आहे. अमेरिकेचे ॲटर्नी जनरल मेरिक गारलॅनड यांनी सांगितल की न्याय विभाग यासंदर्भात चौकशी करेल. आणि मिनीआपोलीस विभागाचा पोलीस प्रशिक्षण, पर्यवेक्षण, आणि पोलीस तुकड्यांचा वापर आदी विविध अंगाने सर्वंकष आढावा घेण्यात येईल

**निधन**

प्रसिद्ध ज्येष्ठ इस्लामीक अभ्यासक मौलाना वाहिदउद्दीन खान यांच्या निधनाबद्दल, राष्ट्रपती रामनाथ कोविन्द यांनी दुख व्यक्त केलं आहे. पद्मविभूषण मौलाना वाहिदउद्दीन यांनी समाजात शांतता, सलोखा आणि परिवर्तन घडवण्यात मोठं योगदान दिलं असं राष्टपतींनी टवीट संदेशात म्हटलं आहे.

---

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.